Page No.: Date: YOUVA

# भागवत एकादशी

वारकरी संप्रदायामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तिभावाने करतात. या दिवशी भगवान विष्णुची पुजा केली जाते. या दिवशी विष्णुभक्त, विठ्ठलभक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसऱ्या दिवशी उपवास सोडला जातो. एकादशीचे स्मार्त आणि भागवत असे दोन भेद सांगितले आहेत.

वारकरी संप्रदायामध्ये परंपरेने एकादशीच्या दिवशी भगवान विष्णुची पुजा करून विष्णुभक्त दिवसभर उपवास करतात. हे व्रत पूर्ण नियम, श्रद्धा व विश्वासाने केले जाते.

## एकादशीचे महत्व

वारकरी संप्रदायामध्ये एकादशीच्या व्रताला विशेष महत्व आहे. प्रत्येक मासात २ याप्रमाणे वर्षामध्ये २४ एकादशी येतात. यातील चैत्रापासुन फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तीनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, पुत्रदा, जया, आमलकी यांचा समावेश होतो.

याशिवाय कृष्ण पक्षात पापमोचनी, वरुथिनी, अपरा, योगिनी, षट्तीला, विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाला आश्रय करून राहतात. म्हणुन जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो. त्याला ती पापे लागतात. म्हणुन एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णु प्रसन्न होतात.

।। रामकृष्ण हरी ।।




अनघा आपटे
सोना पार्क C/23
कोथरूड
Phone- 9146398897